
ISSN : 2278-5914




## सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा

# SANSHODHAN

**Peer Reviewed Research Journal**

**Issue - XIII**

# संशोधन

अंक तेरावा

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | संशोधकाचे नाव | शोधनिबंधाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ३०. | प्रा.डॉ.बाळासाहेब कोटलगी | तासगाव तालुक्याचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान:एक दृष्टीक्षेप | २२५ |
| ३१. | Dr. Saraf Nitin Ulhasrao | Contribution of Anjangaon Surji Area in the Freedom Struggle : With Special reference to Shankarrao Bhayane Guruji | 235 |
| ३२. | प्रा.डॉ.सौ.कल्पना राजीव मोहिते | क्रांतिवीरांगना राजमतीताई पाटील - बिरनाळे यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | २३९ |
| ३३. | श्री.संदीप बळवंत गुरव | श्री.कुंडलिक गोपाळराव देसाई : एक अपरिचित स्वातंत्र्यसैनिक | २५० |
| ३४. | प्रा.मनिषा श्रेणिककुमार पाटील | स्वातंत्र्य सैनिक बापुराव तुकाराम पाटील यांचे प्रतिसरकार व भूमिगत चळवळीतील योगदान | २५७ |
| ३५. | प्रा.शंकर नामदेव गेजगे | जावली तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक सय्यद अदम अबन यांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान | २६५ |
| ३६. | श्री.विकास संभाजी नाईक | क्रांतीकारक श्याम येडेकर यांचे १९४२ च्या स्वातंत्र्यलढयातील कार्य | २६८ |
| ३७. | श्री.देसाई क्रांतीसिंह मारूती डॉ.नाडगौडा आरती बी. | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिवीर काकासाहेब गोपाळ देसाई | २७१ |
| ३८. | प्रा.डॉ.गाढवे किशोर गुलाब | स्वातंत्र्यसैनिक डॉ.श्री.माधवराव मारूतीराव जाधव यांचे स्वातंत्र्याच्या लढ्यातील योगदान | २७९ |
| ३९. | Dr. Waghmare Nalini Avinash | Environment Doctrines in Vachana Sahitya & its Contemporary Relevance | 288 |
| ४०. | प्रा.डॉ.विधाटे गणेश शंकर | अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे पतन | २९८ |
| ४१. | प्रा.डॉ.विश्वनाथ पवार | कोयना जलविद्युत प्रकल्प : जलाशय विंधन प्रक्रिया | ३०८ |
| ४२. | प्रा.डॉ.महेन्द्र मोतीराम इंगळे | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभा व परिषदातून हैद्राबाद मुक्तीसंग्रामात जनजागृती | ३१४ |
| ४३. | प्रा.डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत | डॉ.आंबेडकरांचे भारतीय जातीव्यवस्थेचा उगमाविषयीचे विवेचन : एक ऐतिहासिक विश्लेषण | ३१९ |


Scanned with OKEN Scanner

# अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे पतन

प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर
राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर. ता. जि. अहमदनगर. ४१४००१

**संशोधन पेपरचा उद्देश :**

१. देश स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवर रणदिवे व परुळेकर यांच्या पंडित नेहरू विरोधी सशस्त्र क्रांतीच्या धोरणाचा अहमदनगर जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर पडलेल्या प्रभावाची चर्चा करणे.

२. यशवंतराव चव्हाण यांच्या शिक्षण, सहकार व पंचायतराज या त्रिसूत्रीचा जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर झालेल्या परिणामाची चिकित्सा करणे.

३. चीनचे भारतावरील आक्रमण व कम्युनिस्टांची राजद्रोही भूमिका या काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचा अहमदनगर जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर झालेला परिणाम अभ्यासणे.

४. कम्युनिस्ट पक्षात पडलेल्या फुटीचा जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर पडलेल्या प्रभावाची चर्चा करणे.

५. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांची काँग्रेस पक्षाशी समन्वय साधण्याची भूमिका व त्याचा जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर पडलेल्या प्रभावाची चर्चा करणे.

६. अहमदनगर जिल्ह्यातील वर्गीय व जातीय स्वरूपाचा जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

७. सहकार चळवळीकडे कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या दुर्लक्षाची जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर पडलेला प्रभाव अभ्यासणे.

**प्रास्ताविक :**

अहमदनगर जिल्हा हा १९४० ते १९६० च्या दशकात कम्युनिस्ट पक्षाचा लाल गड म्हणून ओळखला जात होता. या काळात कम्युनिस्ट पक्षाने शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, कामगार, सावकारशाही विरोध दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त इत्यादी प्रश्नावर मोठमोठ्या चळवळी करून जिल्ह्याच्या राजकीय पटलावर आपले वेगळे अस्तित्व

निर्माण केले. तसेच रझाकार विरोधी आंदोलन, गोवा मुक्ती आंदोलन व संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये मध्यवर्ती कम्युनिस्ट पक्षाच्या भूमिकेनुसार त्या यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाने अहमदनगर जिल्हा संयुक्त महाराष्ट्र समितीशी युती केली. व अहमदनगर जिल्हा लोकसभेच्या दोन्ही जागा व विधानसभेच्या १० पैकी ९ जागा जिंकून काँग्रेस पक्षाचा मोठा पराभव केला. विधान-सभेतील ९ पैकी ५ कम्युनिस्ट पक्षाचे विजयी उमेदवार होते. यामुळे अहमदनगर जिल्हात कम्युनिस्ट पक्षाची संघटनात्मक ताकद वाढून जिल्हा कम्युनिस्टमय झालेला दिसून येतो. अहमदनगर जिल्ह्याचा महाराष्ट्रातील कम्युनिस्ट लाल गड असा उल्लेख केला जाऊ लागला. १९६० च्या दशकानंतर मात्र नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीचा जोर ओसरण्यास सुरुवात झालेली दिसते. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर कम्युनिस्ट पक्षात होत असलेल्या अनिष्ठ बदलांच्या परिणामापासून नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते अलिप्त राहू शकले नाहीत. त्यामुळे १९९० च्या दशकात नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे अस्तित्व नाममात्र शिल्लक राहिल्याचे दिसून येते. प्रस्तुत संशोधन पेपरच्या अनुषंगाने अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे महत्व कमी होऊन कम्युनिस्ट पक्षाचे पतन का झाला त्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

### कॉ.रणदिवे व कॉ.परुळेकर यांची भारतीय स्वातंत्र्य संबंधी अतिजहाल भूमिका व त्याचा अहमदनगर जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर झालेला परिणाम

१९४७ साली भारतास मिळालेले स्वातंत्र्य हे बनावट व मूठभर भांडवलदार, जमीनदार व काळाबाजारवाल्यांचे स्वातंत्र्य आहे अशी भूमिका कॉ.रणदिवे व कॉ.परुळेकर यांनी घेतली. त्यांनी प्रस्थापित नेहरू सरकारला साम्राज्यवाद्यांचे हस्तक सरकार ठरवून त्यांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी सशस्त्र क्रांतीची हाक दिली. त्यामुळे नेहरू सरकारने कम्युनिस्ट पक्षावर बंदी घातली. नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या भूमिगत कार्यकर्त्यांनी सावकारांच्या जुलूमशाहीविरुद्ध आणि लेव्हीच्या सक्तीविरुद्ध आंदोलन पुकारले. प्रचलित सतेला आव्हान देऊन नगर जिल्ह्याचा तेलंगण करून आणि चिनी क्रांतीच्या धर्तीवर भारतातही क्रांती घडवून आणावयाच्या निर्धाराने अहमदनगर जिल्हयातील भूमिगत नेते व कार्यकर्त्यांनी चळवळ चालविली होती. पण सर्वसाधारण जनतेच्या पाठिंब्या अभावी अशी चळवळ दीर्घकाळ चालू शकत नाही याची कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना हळूहळू जाणीव होऊ लागली. पक्षाचे हे धोरण चुकीचे व अवसानघातकी आहे याची जाणीव जिल्ह्यात सर्वप्रथम अण्णासाहेब शिंदे

Scanned with OKEN Scanner

यांना झाली होती. पक्षबंदीच्या काळात नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांवर सरकारी दडपशाहीचा बुलडोझर फिरू लागला. त्यामुळे येरवाड्याच्या तुरुंगात असलेल्या अण्णासाहेब शिंदे यांनी १९४८ च्या रणदिवे गटाच्या भूमिकेला विरोध करून काही प्रश्नांवर लेखी निवेदन दिले. पक्षाच्या धोरणाविरुद्ध अण्णासाहेब शिंदेंनी घेतलेली ही उघड भूमिका कॉ.रणदिवे व कॉ.परुळेकर यांना पक्षद्रोह वाटल्याने त्यांना कम्युनिस्ट पक्षातून काढून टाकण्यात आले. अण्णासाहेब शिंदे यांना याचे फार दुःख वाटले व त्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊन पक्ष त्याग केला. एस.के.लिमये यांचा गटही याचा काळात कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडला होता. जरी अण्णासाहेब शिंदे यांच्याबरोबर जिल्ह्यातील महत्वाच्या कार्यकर्त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचा त्याग करण्याचा निर्णय घेतला नाही तरी १९५० नंतर कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीमध्ये विस्कळीतपणा आला. हळूहळू अनेक कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षापासून दूर जाऊ लागले. चंद्रभान आठरे पाटील यांनीही अखेर पक्षाचा त्याग केला.[१] थोडक्यात १९४८ च्या कॉ. रणदिवे गटाच्या जहाल भूमिकेमुळे नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या संघटनात्मक सामर्थ्याला पहिल्यांदाच फुटिरतेचे ग्रहण लागून कम्युनिस्ट पक्षाची राजकीय हानी झालेली दिसून येते.

## यशवंतराव चव्हाण यांच्या त्रिसूत्री कार्यक्रमास अहमदनगर जिल्ह्यातील बहुजन कम्युनिस्टांनी दिलेला प्रतिसाद

योग्य संधी मिळताच सत्तारूढ पक्षात प्रवेश करून सत्तापद प्राप्त करणे ही नगर जिल्ह्याची खास परंपरा आहे. १९६० साली स्वतंत्र महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर शेटजी-भटजीचे वर्चस्व बदलून यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली बहुजनांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा काँग्रेस पक्षाने निर्णय घेतला. यशवंतराव चव्हाण यांना मुख्यमंत्री केल्यानंतर त्यांनी ग्रामीण बहुजन समाजासाठी शिक्षण, सहकार व पंचायत राज असा त्रिसूत्री कार्यक्रम आखला. ही त्रिसूत्री बहुजन समाजातील शेतकऱ्यांना विशेषतः मराठ्यांना सत्तापद प्राप्त करण्याची सुवर्णसंधी वाटली. लवकरच या यशवंतनीतीला इतर जातीजमातींचाही पाठिंबा मिळाला.[२] शिक्षण व सहकार क्षेत्रात काँग्रेसने स्वायत्त, संस्थात्मक व रचनात्मक बांधणीला महत्व दिले. पंचायत राज संस्थामार्फत अनेक कार्यकर्त्यांना सतेची आमिषे दाखविली गेली. नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे दोन नेते चंद्रभान आठरे व अण्णासाहेब शिंदे यांनी आधीच काँग्रेस पक्षाची वाट धरली होती. १९६० नंतर पक्षांतरची ही प्रक्रिया जोरात सुरू झाली. भाऊसाहेब थोरात, लक्ष्मणराव पालवे, बाबुजी आव्हाड, रावसाहेब शिंदे, शिवाजीराव

नागवडे, शंकरराव काळे, दादा पाटील राजळे आदी कम्युनिस्ट विचारसरणीच्या नेत्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने कम्युनिस्टांची जिल्ह्यातील ताकद कमी होऊ लागली. १९६७ च्या नगर जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा, पंचायत समित्या व जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या चंद्रभान आठरे, अण्णासाहेब शिंदे एकनाथराव विखे पाटील, आबासाहेब निंबाळकर, मारुतराव घुले, दादासाहेब तनपुरे, के.बी.रोहमारे, शंकरराव कोल्हे, शंकरराव काळे, पी.आर.कानवडे, शिवाजीराव नागवडे इत्यादींनी कम्युनिस्टां पुढे मोठे आव्हान उभे केले. कम्युनिस्टांनी त्या विरुद्ध लढा दिला. परंतु खंदे पुढारी पक्ष सोडून गेल्याने कम्युनिस्ट पक्षाला हे आव्हान पेलणे जड गेले व त्यांना निवडणुकीत पराभव पत्करावा लागला.३ पक्षांतराची व पराभवाची ही मालिका पुढे नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांना थोपविणे शक्य झाले नाही.

**राष्ट्रीय पातळीवर कम्युनिस्ट पक्षात पडलेल्या फुटीचा अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षावर झालेला परिणाम**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर काँग्रेसने जुनी कात टाकून दिली. अण्णासाहेब शिंदे, आबासाहेब निंबाळकर, चंद्रभान आठरे यांना हाताशी धरून काँग्रेसने नगर जिल्ह्यातील आपला प्रभाव वाढविण्यास सुरुवात केली. काँग्रेसचा वारू चौफेर उधळत असतांना कम्युनिस्ट पक्ष मात्र अंतर्गत झगड्यात अडकून पडला होता. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांनी ऑक्टोबर १९६२ च्या राष्ट्रीय कौन्सिलच्या बैठकीत चीनच्या आक्रमणाचा निषेध करणारा व सामोपचाराच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याचे आवाहन करणारा ठराव मंजूर करवून घेतला. मात्र कम्युनिस्ट पक्षातील जहाल गटाने अतिरेकी राष्ट्रवादाच्या भावनेच्या भरात समाजवादी देश आक्रमण करीत नसतात असा पावित्रा घेऊन चीनचा निषेध करणारा ठराव उधळून लावला. त्याचा फायदा घेऊन भांडवली विचाराच्या वृतपत्रांनी कम्युनिस्ट राष्ट्रद्रोही आहेत असा प्रचार सुरू केला.४ प्रत्येकजण आपली बाजू लढविण्यात व आपले कार्यकर्ते सांभाळण्यात गुंतून पडले. १९६२ च्या धक्क्यातून पक्ष बाहेर पडतो न पडतो तोच १९६४ साली कम्युनिस्ट पक्षात फुट पडली. पक्षांतर्गत उजवे-डावे असा झगडा सुरू झाला. नगरचे कम्युनिस्टही या झगड्यात गुंतले व कॉ.डांगे यांच्या नेतृत्वाखाली जहाल डाव्या कम्युनिस्टांविरुद्ध भूमिका घेऊन आपला गड शाबूत ठेवण्याच्या प्रयत्नात गुंतून पडले. काँग्रेसने नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांचे खच्चीकरण करण्यासाठी कॉ.पी. बी. कडू, कॉ.एकनाथ भागवत, कॉ.बाळासाहेब नागवडे, कॉ.रामभाऊ नागरे, कॉ.अचपळराव लांडे पाटील, कॉ.बुवासाहेब नवले, कॉ.कृष्णा पवार, कॉ.भास्करराव

औटी, कॉ.गणीभाई कॉ.दत्ता देशमुख, कॉ.बापूसाहेब भापकर, आदी कम्युनिस्ट पुढाऱ्यांना अटक करून तुरुंगात टाकले. त्यामुळे नगर जिल्ह्यातील जनता संभ्रमीत झाली व कार्यकर्त्यांचे मनोबल खचले.[५] ह्या वावटळीत काँग्रेसवाल्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या बाबुजी आव्हाड, लक्ष्मण पालवे, भास्कर पाटील गलांडे, शाहू पाटील कापरे, कि. बा. म्हसके, श्रीपतराव सातपुते इत्यादी प्रमुख पुढाऱ्यांना कम्युनिस्ट पक्षातून फोडले. मात्र कॉ.पी. बी. कडू, कॉ.एकनाथ भागवत, कॉ.बाळासाहेब नागवडे, कॉ.रामभाऊ नागरे, कॉ.अचपळराव लांडे पाटील, कॉ.बुवासाहेब नवले, कॉ.कृष्णा पवार, कॉ.भास्करराव औटी, कॉ.राम रत्नाकर, कॉ.शशिकांत कुलकर्णी, कॉ.बाबूराव थोरात, कॉ.धोंडी भाऊ वर्पे, कॉ.बी.के.देशमुख, कॉ.बाबासाहेब ठुबे आदी कम्युनिस्ट पुढारी कॉ.डांगे यांच्यासोबत राहिले. जिल्हा कम्युनिस्ट पक्षातर्फे कॉ.डांगे यांनी घेतलेले धोरण पक्ष कार्यकर्त्यांना समजावून सांगण्यासाठी बैठकांचे सत्र सुरू करण्यात आले. देश संरक्षण व जनता संरक्षणाचे धोरण घेऊन पक्ष जनतेमध्ये गेला. परंतु त्यामुळे पक्षाच्या झालेल्या नुकसानाची भरपाई होऊ शकली नाही.[६]

**अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचा विशिष्ट जात वर्गामध्ये झालेला प्रसार**

नगर जिल्हा कम्युनिस्ट पक्षाचे बहुतेक पुढारी मराठा शेतकरी होते. या पुढाऱ्यांना शेतकरी वर्गात चांगला पाठिंबा होता. १९६० नंतर यशवंतराव चव्हाणांच्या विकास कार्यक्रमाने ते प्रभावित होणे स्वाभाविक होते. कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेसच्या या यशवंतनीतीला पाठिंबा देऊन काही काळाने त्याच्या मर्यादा दाखविणे आवश्यक होते. परंतु पक्षाकडून तसे धोरण घेतले गेले नाही. परिणामी कम्युनिस्ट पक्षाचा हक्काचा मराठा शेतकऱ्यांचा जनाधार तुटला गेला. काँग्रेसने व्यवहाराच्या पातळीवर बहुजन समाज म्हणजे मराठा वर्चस्व व काँग्रेस म्हणजे मराठ्यांचा पक्ष असा प्रचारही केला. यामुळे मराठा समाज काँग्रेसकडे झुकला. इतर जाती जमातींपैकी पाथर्डीचा वंजारी समाज व राहुरीचा धनगर समाज सोडून इतर समाजाचा कम्युनिस्टांना पाठिंबा मिळविता आला नाही. पुढे वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाल्यावर वंजारी समाजही काँग्रेसकडे वळला. वर्गीय अंगाने गरीब शेतकरी-शेतमजूर यांचे स्वतंत्र संघटन कम्युनिस्टांकडून झाले नाही. थोडक्यात वर्गीय व जातीय पायात फक्त मराठा मध्यम शेतकरी स्तराचा होता व तो ढासळल्यानंतर कम्युनिस्टांच्या हाताशी विशेष काही उरले नाही. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांमध्ये नैराश्य आले. तरुण कार्यकर्त्यांचा ओढा पक्षाकडे कमी होत गेला. क्रांतीची भाषा, पक्षाच्या भूतकालीन वैभवाचे पुनरुज्जीवन, चिकाटी, पक्षनिष्ठा, दुष्काळ, पाणी, शेतकरी व कामगारांच्या प्रश्नावर केलेल्या

चळवळी या मधून कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव टिकवून ठेवण्यास नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पुढाऱ्यांना यश आले नाही.[७]

### कॉम्रेड डांगे यांच्या कॉंग्रेस पक्षाचे समन्वयाच्या भूमिकेचा अहमदनगर जिल्हा कम्युनिस्ट पक्षावर झालेला परिणाम

१९६२ चे चीनचे भारतावरील आक्रमण व १९६४ च्या भा. क. पक्षामधील फुटीनंतर कॉ.डांगे यांची धोरणे काँग्रेसशी जवळीक वाढविण्याच्या दिशेने पडू लागली. कॉ.डांगे यांनी पं. नेहरूंनी समाजवाद, लोकशाही, अहिंसावाद व वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद यांच्या आधारे भारतात नवे राष्ट्र उभा करण्याबाबत जे कार्य केले त्याची प्रशंसा केली. तसेच राष्ट्राची प्रतिष्ठा, एकात्मता, सार्वभौमत्व यांच्या संरक्षणासाठी पं. नेहरूंना भा.क.पक्षाचा पाठिंबा घोषित केला.[८] चीनच्या भारतावरील आक्रमणाचा कॉ.डांगे यांनी निषेध केला. पं. नेहरूंच्या विनंतीवरून त्यांनी रशियन नेत्यांना चिनी आक्रमणावेळी भारताची बाजू समजावून सांगितली. परिणामी रशियाने चीनच्या भारतावरील आक्रमणाचा निषेध केला.[९] १९६४ साली भा.क. पक्षात फुट पडल्यानंतरही कॉ.डांगे यांनी काँग्रेसच्या नियोजनबद्ध विकास, अलिप्ततावाद, लोकशाही, पंचशील आदी पुरोगामी धोरणांना पाठिंबा देऊन समन्वयाची भूमिका घेतली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मात्र कॉ.डांगेंच्या वर्ग समन्वयवादी धोरणावर टिका करून त्यास काँग्रेसशी आघाडी करून सतेचे राजकारण करावयाचे आहे. पक्षाच्या क्रांतिकारक राजकीय परंपरा कॉ.डांगे यांना मान्य नाहीत असा आरोप केला.[१०] भा.क. पक्ष व मा.क. पक्षामधील वादाचे पडसाद नगर जिल्हा कम्युनिस्ट पक्षाच्या राजकारणावर पडून कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत कोपरगाव मतदार संघात काँग्रेसचे उमेदवार बाळासाहेब विखे यांच्या विरोधात कम्युनिस्ट पक्षाचे कॉ.पी. बी. कडू पाटील उभे होते. कॉ.डांगे हे काँग्रेसशी एकनिष्ठ असल्याने त्यांनी विखे यांना पाठिंबा दिला. बाळासाहेब विखे हे जिल्ह्यातील प्रस्थापित पक्षातील बडे राजकीय पुढारी असल्याने त्यांना विजय मिळविणे सोपे होते. तरीही कॉ.डांगे यांच्या काँग्रेस समर्थक धोरणामुळे कार्यकर्ते गोंधळात पडले.[११] १९७५ च्या आणीबाणीमध्ये नगर जिल्ह्यात कम्युनिस्ट व काँग्रेसची फॅसिझमविरोधी आघाडी स्थापन करण्यात आली. या आघाडीचा उद्देश फॅसिझमला विरोध करणे व काँग्रेस मधील उजव्या व प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची गटबाजी संपुष्टात आणणे व काँग्रेसचे डावीकरण करणे हा होता. कॉ.डांगे हे फॅसिझमविरोधी आघाडीचे समर्थक होते. कॉ.एकनाथ भागवत, कॉ.पी. बी. कडू

पाटील, कॉ.कृष्णा पवार, कॉ.पंढरीनाथ सहाणे मास्तर हे कॉ.डांगेंचे समर्थक असल्याने त्यांनी काँग्रेस पुढाऱ्यांसह जिल्ह्यात फॅसिझमविरोधी आघाडीच प्रचार केला. मात्र आणीबाणीच्या काळात ज्यावेळी सरकारकडून दडपशाहीचे प्रकार सुरू झाले तेव्हा जिल्ह्यातील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल सुरू झाली. कॉ.ए. बी. वर्धन, कॉ.माधवराव गायकवाड, कॉ.गोविंद पानसरे यांनी कॉ.एकनाथ भागवत व कॉ.कडू पाटील यांच्यावर टिकेची झोड उठवून कम्युनिस्ट व काँग्रेसच्या युतीला विरोध केला. साहजिकच काँग्रेस व कम्युनिस्ट यांच्यातील सुसंवाद संपुष्टात येऊ लागला. १९७८ साली भाकपचे राष्ट्रीय अधिवेशन पंजाबमधील भटिंडा येथे झाले व त्यामध्ये कॉ.डांगे यांचा आणीबाणी संबधीचा ठराव मंजूर झाला नाही. भटिंडा काँग्रेसनंतर कॉ.डांगे यांनी १९८० साली ऑल इंडिया कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केल्याने कॉ.डांगे यांची भा.क. पक्षातून हकालपट्टी करण्यात आली.[१२] कॉ.एकनाथ भागवत, कॉ.कडू पाटील, कॉ.पंढरीनाथ सहाणे, कॉ.बाबासाहेब ठुबे, कॉ.कारभारी उगले, कॉ.कृष्णा पवार हे कॉ.डांगे यांच्या विचारांचे समर्थक होते. त्यांनी कॉ.डांगे यांना पाठिंबा दिल्याने त्यांना भा.क. पक्षातून काढून टाकण्यात आले. कॉ.डांगेच्या समर्थनाच्या प्रश्नावरून कम्युनिस्ट पक्षात पडलेल्या फुटीमुळे नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांचे राजकीय सामर्थ्य मोठ्या प्रमाणावर खच्ची झाले.[१३] त्यातच १९८० च्या लोकसभा निवडणुकीत कोपरगाव मतदार संघातून काँग्रेसच्या बाळासाहेब विखे यांच्याविरुद्ध नगर जिल्ह्याच्या डाव्या चळवळीचे अर्धव्यू अण्णासाहेब शिंदे यांच्या पराभवाने जिल्ह्यातील कम्युनिस्ट कार्यकर्ते नाराज झाले. त्यांनी उघडपणे कम्युनिस्ट पक्षावर टिका करावयास सुरुवात केली. या सगळ्याच्या परिणामी फार मोठ्या संख्येने कम्युनिस्ट कार्यकर्ते पक्ष सोडून गेल्याने नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाला ओहोटी लागली.[१४]

### सहकार चळवळीकडे अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांशी झालेले दुर्लक्ष

'सतेचा मार्ग हा सहकारातून जात असतो' असे नगर जिल्ह्यातील शेवगावचे कम्युनिस्ट पुढारी कॉ.कृष्णा पवार यांनी आपल्या मुलाखतीमधून स्पष्ट केले. सहकार हा कम्युनिस्टांच्या थिअरीचा एक भाग होता. नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पुढाऱ्यांना चळवळीमधून सर्वसामान्यांच्या प्रश्नाचे, विकासाचे भान आल्याचे दिसते. त्यामुळे नगर जिल्ह्यातील कॉ.पी. बी. कडू पाटील, कॉ.वकीलराव लंघे, कॉ.बाबासाहेब ठुबे या कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी सहकार चळवळीत भाग घेतल्याचे दिसून येते. परंतु असे असले तरी सहकार चळवळीत भाग घेणे वेगळे व जाणीवपूर्वक सहकारी संस्थांची उभारणी करून त्या आपल्या ताब्यात ठेवणे हा वेगळा भाग

असतो. नगर जिल्ह्यातील सहकारी चळवळीची पायाभरणी काँग्रेसने केलेली होती. १९६० नंतर यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय आकृतीबंधानुसार सहकारी संस्था व पंचायत राज संस्था यांच्या आधारे राजकीय सतेची उतरंड निर्माण करणारी त्याकाळातील ही व्यूहरचना होती. श्रीमंत बागाईत शेती करणाऱ्या मराठा शेतकऱ्याला राजकीय सतेत सामावून घेऊन आपली राज्यपातळीवरील सत्ता व वर्चस्व कायम राखणे हा सहकारी संस्थांच्या निर्मितीमागे हेतू होता. राज्यसरकारच्या साहाय्याने उभ्या राहिलेल्या या सहकारी चळवळीमुळे काँग्रेसचे वर्चस्व नगर जिल्ह्यात प्रस्थापित झाले.[१५] नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांचा चळवळीच्या माध्यमातून कार्यकर्त्यांचा संच तयार झाला होता. या चळवळीच्या पुण्याईच्या आधारे त्यांना सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, सहकारी दुध संस्था, सूत गिरण्या, नागरी पतसंस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या, जिल्हा परिषदा यांच्या निवडणुका जिंकणे सोपे गेले असते. ट्रेड युनियनच्या माध्यमातून शहरी भागातील कम्युनिस्ट कार्यकर्ता चळवळीत कायम सक्रिय राहिला. दुर्दैवाने सहकारी संस्थांच्या उभारणीकडे व एकंदर सहकार चळवळीकडे नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांचे दुर्लक्ष झाल्याने ग्रामीण भागातील कार्यकर्त्याला उभा करण्याची यंत्रणा व साधने नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांना निर्माण करता आली नाही. काँग्रेसवाल्यांनी सहकारी संस्थांमध्ये भ्रष्टाचाराची जी बजबजपुरी निर्माण केली ती थांबवून कम्युनिस्ट संस्कार व विचारधारेनुसार तळागाळातील लोकांपर्यंत विकासाची गंगा सहकाराच्या माध्यमातून पोहचविणे नगर जिल्ह्यातील कम्युनिस्टांना शक्य झाले असते. परंतु दिल्लीची चर्चा करणाऱ्या कम्युनिस्टांना गावची सत्ता ताब्यात ठेवता येत नाही. कारण ते सहकारी चळवळीत नाही ही वास्तव परिस्थिती जिल्ह्यातील कम्युनिस्ट पुढाऱ्यांच्या लक्षात येण्यास खूप उशीर झाला होता. १९९१ नंतर मनमाडला महाराष्ट्र राज्य कौन्सिलची दोन दिवसाची बैठक झाली. त्यात दोन दिवस सहकारात भाग घ्यावयाचा की नाही यावर विचारमंथन होऊन अखेर सहकारी चळवळीत कम्युनिस्टांनी हिरारीने भाग घेतला पाहिजे असा निर्णय घेण्यात आला. परंतु तो पर्यंत सहकारी संस्थांवर काँग्रेसवाल्यांचे पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले होते. शिवाय त्यांच्या भ्रष्ट प्रवृत्तींमुळे सहकारी संस्थांचे अस्तित्वही धोक्यात आले होते.[१६] थोडक्यात जिल्हा पातळीवरील सतेचा घोडा आपल्या ताब्यात ठेवायचा असेल तर सहकाराचा लगाम आपल्या ताब्यात असणे आवश्यक आहे हे समीकरण ध्यानात न घेतल्याने नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाला ओहोटी लागल्याचे दिसून येते.

Scanned with OKEN Scanner

## सारांश :

१९४० ते १९५० चे दशक हा अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचा चळवळी काळ होता. शेतकरी, कामगार, शेतमजूर यांच्या प्रश्नावर अनेक चळवळी करून या वंचित घटकांमध्ये कम्युनिस्ट पक्षाने आपला मोठा प्रभाव निर्माण केला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परुळेकर व रणदिवे गटाच्या अतिसाहसवादी धोरणामुळे कम्युनिस्ट पक्षाला फुटीचे ग्रहण लागले. त्यातून पक्ष लवकरच सावरलेला दिसतो. मात्र १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर नगर जिल्ह्यात काँग्रेसचा वारू चौफेर उधळत असतांना कम्युनिस्ट पक्षाला मात्र प्रभावी नेतृत्वाची व कार्यकर्त्यांची वाणवा जाणवू लागली होती. अनेक पुढारी व कार्यकर्ते पक्षाचा लाल झेंडा खांद्यावर घेऊन पक्षाच्या अस्तित्वासाठी झगडत असल्याचे दिसून येत होते. परंतु मध्यवर्ती कम्युनिस्ट पक्षाच्या झालेल्या काही अक्षम्य चुका, त्याविरुद्ध नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट नेतृत्वाने घेतलेली बंडखोर भूमिका, कम्युनिस्ट पक्षात पडलेली १९६४ व १९८० ची फूट, आंतरराष्ट्रीय पातळीवर साम्यवादाला लागलेली ओहोटी, कम्युनिस्टांचे सहकार चळवळीकडे झालेले दुर्लक्ष या सर्व घटकांमुळे नगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाची चळवळ नाममात्र शिल्लक राहिल्याचे दिसून येते. थोडक्यात महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पडणाऱ्या व साखर सम्राटांचा आणि सहकार चळवळीचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध असलेल्या नगर जिल्ह्यातील राजकारणाचे स्वरूप सातत्याने बदलत गेल्याचे दिसून येते. १९४० ते १९६० पर्यंत 'लालबावट्याचा जिल्हा' म्हणून कम्युनिस्ट पक्षाची ओळख होती. १९६० नंतर 'लाल बावटा' 'तिरंगा' होऊ लागला आणि १९९० नंतर 'तिरंगा' 'भगवा' होऊ लागलेला दिसतो. बदलत्या परिस्थितीची आव्हाने अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाला पेलता न आल्याने कम्युनिस्ट पक्षाचा लाल गड कोसळून पडल्याचे दिसते.

## संदर्भ ग्रंथसूची :

१. भावे सविता, 'कृषिक्रांतीचे सेनानी अण्णासाहेब शिंदे', कल्पना मुद्रणालय, सदाशिव पेठ, पुणे, पृ. क्र. १८८-१८९.

२. साप्ताहिक सकाळ, 'अहमदनगर जिल्हा विशेषांक', दि. १८ ते २४ जुलै १९९२, पृ. क्र. १२.

३. टेमकर राजधर, 'डाव्या चळवळीची उजवी बाजू', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१२, पृ. क्र. १०८-१०९.

४. डांगे उषाताई, 'पण ऐकतंय कोण', विचारभारती प्रकाशन, मुंबई, २००३, पृ. क्र. २३७.

५. नवले मधुकर, 'गाठी ऋणानुबंधाच्या', प्रकाशक, एम.के.इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड, नारायणगाव, पुणे, मार्च २०२१, पृ. क्र. १४०.

६. लाड श्रीकांत (संपा.), 'भारतीय कम्युनिस्ट पक्षाची ५० वर्षे', भारतीय कम्युनिस्ट पक्ष प्रकाशन, मुंबई, जानेवारी १९७६, पृ. क्र. ५५-५६.

७. औटी विद्याधर भास्करराव., संशोधन चिंतन, प्रतिमा पब्लिकेशन, अहमदनगर, जून २०१०, पृ. क्र. २०१-२०२.

८. रणदिवे बाबुराव, 'कॉम्रेड डांगे', अभिनव प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १० ऑक्टोबर १९८९, पृ. क्र. १४७.

९. चौसाळकर अशोक, 'कॉ.श्रीपाद अमृत डांगे', लोकवांडमय गृह, मुंबई, पहिली आवृती २०११, पृ. क्र. ३३२.

१०. कित्ता, पृ. क्र. ३४१-३४२.

११. टेमकर राजधर, 'डाव्या चळवळीची उजवी बाजू', उपरोक्त, पृ. क्र. ११०.

१२. चौसाळकर अशोक, 'कॉ.श्रीपाद अमृत डांगे', उपरोक्त, पृ. क्र. ३८७.

१३. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १६/०८/१९८१, पृ. क्र. १.

१४. टेमकर राजधर, 'डाव्या चळवळीची उजवी बाजू', उपरोक्त, पृ. क्र. १११.

१५. देशमुख गणेश (संपा.), 'ग्रामवेद-महाराष्ट्राच्या ग्रामजीवनाचे सर्वांगीण चिंतन', उपरोक्त, पृ. क्र. ११७.

१६. का. प्रकाश (राजु) देसले, 'मुलाखत दि. २६/०३/२०२२', राज्यसचिव, आयटक कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य, मु. पो. गंगापूर, ता. नाशिक, जि. अहमदनगर.


❑ ❑ ❑



Scanned with OKEN Scanner